नि. फौ. ख. क्र. १९३/२०१७ निशाणी ४५

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – शिवम चंदनसिंग ठाकुर

वय – २७ वर्षे, व्यवसाय – मजुरी

पत्ता – खदान, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर.लोखंडे यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. घटनेला ५–६ वर्ष झाले. त्यावेळी मी पारस येथील सी.एल. शॉपवर मॅनेजर म्हणुन कार्यरत होतो. आम्ही नेहमीप्रमाणे रात्री दुकान बंद करुन घरी गेलो आणि दुसऱ्या दिवशी दुकान उघडुन पाहिले असता दुकानाच्या भिंतीला छिद्र करुन २०–२२ देशी दारुच्या पेटया चोरीला गेल्याचे आढळुन आले. म्हणुन मी बाळापुर पोलीस स्टेशनला जावुन रिपोर्ट दिला. आता मला रिपोर्ट दाखविण्यात आला. तो तोच असुन, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४६** देण्यात येत आहे. आता मला प्रथम छापील खबर दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४७** देण्यात येत आहे. पोलीसांनी सदर घटनेसंदर्भात आमच्याकडे चौकशी केली त्यावेळी संशयीत व्यक्ती म्हणुन गोविंदा खंडारे, रा. पारस या व्यक्तीचे नाव सांगितले. गोविंदा खंडारे सोबत त्याचा भाऊ सागर खंडारे आणि एक अनोळखी इसम संशयीत व्यक्ती म्हणुन होता. त्या व्यक्तीचे नाव मला माहित नाही. चोरी गेलेल्या मुद्देमाल मधुन काही मुद्देमाल पोलीसांनी आम्हाला परत केला. उर्वरित मुद्देमाल मिळुन आला नाही. मला संशयीत आरोपींविरुध्द सदरचे प्रकरण चालविणे नाही. ज्या व्यक्तीकडुन मुद्देमाल हस्तगत केला त्यांना पाहिल्यास मी ओळखु शकेल.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपी क्र. १ तर्फे विधीज्ञ श्रीमती व्ही. एच. शेगोकार यांच्या मार्फत**

२. आमचे दुकान भर वस्तीत आहे. त्यामुळे तेथे लोकांची नेहमी वर्दळ असते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या दुकानाच्या आजुबाजुला इतर लोकांची दुकाने आहेत. दुकानाच्या बाजुला पारस विद्युत औष्णीक केंद्र असल्यामुळे सदरचा रस्ता वर्दळीचा आहे. आमचे दुकानाचे बांधकाम सिमेंट क्राँक्रीटचे असुन पक्के आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या दुकानावर रात्रपाळी चौकीदार असतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे

सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

(**सदर प्रकरणात आरोपी क्र. २ व ३ फरार आहे. मा. उच्च न्यायालय आणि जिल्हा न्यायालय यांच्या आदेशान्वये जुनी प्रकरणे निकाली काढण्याच्या उद्देशाने सदर प्रकरणातील साक्षीदाराची साक्ष फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ अंतर्गत नोंदविण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द उलटतपास राखीव.**)

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2026.02.10 11:14:38 +0530

बाळापूर.
दि.०९/०२/२०२६

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर